# जळगाव शहरातील सराफ बाजारातील दरोडा उघड

दिनांक -०२/०१/२०१४ रोजी ००.०० ते ०३.३० वाजेचे सुमारास जळगाव शहरात सराफ बाजारात दागिना कॉर्नर नावाचे सोने-चांदीचे दुकानाचे समोर बसलेल्या वॉचमनच्या अंगावर कापड टाकुन त्यास बांधुन गाडीत कोबुंन ठेवुन दुकानाचे लोखंडी शटर टॉमीने उघडुन दुकानात प्रवेश करुन दुकानातील १२,१८,९८८/- रु सोन्या-चांदीचे दागीने व रोख रुपये चोरुन नेले होते व वॉचमन यास पळवुन नेवुन राट्रीय महामार्ग क्रमाक -६ वर जळगाव शहरापासुन ४५ कि.मी.अंतरावर फेकुन दिले होते. जळगव शहरातील सराफ बाजारात खाजगी रक्षक पोलीसांची गस्त कायम असते. तरी देखील आरोपीतांनी मोठ्या धाडसाने सदर ठिकाणी दरोडा टाकलेला होता. गुन्हा उघडकीस आणने हे पोलीसांकरीता मोठे आव्हान होते.

सदर दुकानाचे समोरील व सराफ बाजारातील लावलेले **CCTV Futage** मिळवुन सदर फुटेजचे दोन दिवसाचे रेकार्डीग बारकाईन चेक करण्यात आले गुन्हा घडते वेळी देखील आरोपीतांचे गुन्हा करतांनाचे फुटेज मिळुन आले होते, परंतु अंधार असल्यामुळे आरोपीतांचे चेहेरे स्पष्ट दिसत नव्हते म्हणुन आरोपीतांचे पेहराव , चालण्याच्या पध्दती व प्रतीमेच्या आधारावर आदल्या दिवशीच्या इतर सी सी टी व्ही फुटेज चे बारकाईने अवलोकन करुन आरोपीतांचे पेहरावा सारखे व चाली सारखे इसम दिसुन आले त्यात काही संशयीत इसम हे जळगाव शहरात आले व येवुन जळगाव शहरातील कोणत्याही व्यक्तीशी संपर्क न करता फक्त उत्तर प्रदेश राज्यातील लोकांचेच संपर्कात असल्याचे लक्षात आल्याने त्यांचे सपर्कातील एका इसमास शिताफिने औरंगाबाद येथुन ताब्यात घेवून त्यास फुटेज दाखविले असता ते नईम तत्तड व इतर लोकांचे असल्याचे त्याने सांगीतले त्या प्रमाणे अलीगड ( उत्तर प्रदेश ) येथे आरोपीतांना जळगाव पोलीस गेले असता तेथील वस्तीतील जमावाने पोलीसांना सुमारे ३ तास अटकावून ठेवले होते. तरी देखील पोलीसांनी जीवाची पर्वा न करता हिमतीने अरोपीतांना ताब्यात घेवून विचारपुस केली असता त्यांनी गुन्हा केल्याचे कबुल केलेले आहे. सदर चे आरोपी हे अटटल दरोडेखोर असुन त्यांनी महाराष्ट्र, गुजरात,मध्यप्रदेश उत्तर प्रदेश , दिल्ली ,हरीयाणा राज्यात गंभीर स्वरुपाचे गुन्हे केलयाचे उघडसकीस आलेले आहे.

<u>अरोपींचे नावे.</u>

| | | |
|---|---|---|
| १ | जिल्हा | जळगाव |
| २ | पो.स्टे. | शनिपेठ पो.स्टे. |
| ३ | गुरन. | भाग-५ - २ /२०१५ भादवि.क.३९५ ,३६३ आर्म ॲक्ट -३/२५ |
| ४ | गुन्हा घडला दिनांक /वेळ | दिनांक -०२/०१/२०१५ रोजी ००.०० ते ०३.३० वाजता |
| ५ | गुन्हा दाखल दिनांक /वेळ | दिनांक -०२/०१/२०१५ रोजी सकाळी ११.१५ वाजता |
| ६ | घटनास्थळ | जळगाव शहरात सराफ बाजारात दागिना कॉर्नर नावाचे ज्वेलर्स दुकानात |
| ७ | गेला माल | १२,१८,९८८/- रु सोन्या-चांदीचे दागीने |
| ८ | मिळाला माल | १२,१८,९८८/- रु सोन्या-चांदीचे दागीने |
| ९ | वापरलेले वाहन | टाटा सफारी |
| १० | आरोपीतांचे नाव | १) नईम तत्तड उर्फ छोटे पहेलवान कुरेशी उ.व. २८<br>२) खातीम बशिर कुरेशी उ.व. २७ दोन्ही रा. अलीगड, उ.प्र. |